MHST150015142022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २७.०१.२०२३ |
| नोंद तारीख | : | २७.०१.२०२३ |
| निकाल तारीख | : | २७.०२.२०२५ |
| कालावधी | : | ०२व.०१म. ००दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडूज, ता.खटाव यांच्या न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी शिवाजी.आर.गुळवे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. २३३/२०२२** **निशाणी क्र. २९**

| गुन्हा नोंद क्र. २००/२०२०, भा.दं.वि. कोड कलम ३७९ सह ३४, पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ प्रमाणे | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>ठाणे अंमलदार<br>वडूज पोलीस ठाणे,<br>ता. खटाव, जि. सातारा. |
| अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी.व्ही. जोशी |
| आरोपी | | समीर श्रीकांत गोडसे<br>वय – २६ वर्षे, धंदा – शेती<br>रा. वडूज ता.खटाव जि.सातारा |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एस. एस. भोसले |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०२.०६.२०२१ |

| | |
|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | ०३.०६.२०२१ |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | २७.०१.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २६.०९.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०५.०१.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | २७.०२.२०२५ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक दिनांक** | **जामिनावर सोडल्याचा दिनांक** | **गुन्हयाचे कलम** | **अंतिम आदेश** | **शिक्षा** | **फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | समीर श्रीकांत गोडसे | १६.०२.२०२१ | १७.०२.२०२१ | भारतीय दंड संहिता कलम ३७९ व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ प्रमाणे. | आरोपीस निर्दोष मुक्त करणेत आले. | - | - |

## <u>भाग – क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अमीर अल्लाबक्ष तांबोळी | पंच | १८ |
| २. | संदिप हणमंत शेडगे | फिर्यादी | २१ |
| ३. | भिमराव पांडूरंग कदम | वाहन जप्ती पंच | २३ |
| ४. | राहुल साहेबराव सरतापे | तपासी अंमलदार | २६ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | २२ | फिर्याद |
| ३. | २७ | घटनास्थळ पंचनामा |

## न्यायनिर्णय

(दिनांक २७/०२/२०२५ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे.

## अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे

२. दि. ०२/०६/२०२० रोजी २३.०० वाजताचे सुमारास फिर्यादी पोलीस ठाणेस हजर असतांना पो.नि. अशोक पाटील यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वडूज ते सि.कुरोली जाणारे रोडवर वडूज गावचे हद्दीत मामाचा मळाचे पुढे पुलाचे

शेजारील ओढयामध्ये वाळूचे उत्खनन करुन ट्रॅक्टरचे मदतीने वाहतूक करीत आहे. त्यानंतर ते, पो.हवा. वायदंडे, पो.कॉ. बदडे, पो. कॉ. हांगे असे खाजगी गाडीने तेथे गेले. ते वडूज येथून सिध्देश्वर कुरोली रोडने मामाचा मळा येथे पुलाचे शेजारी मोटार सायकल थांबवून पुलाचे उत्तर बाजुस ओढयामध्ये जावून पाहिले असता त्याठिकाणी आरोपी ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये वाळू भरीत असल्याचे दिसले. त्यांची चाहुल लागल्याने ट्रॅक्टर व ट्रॉली तेथेच सोडून चालक व इतर लोक अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. त्यांनी सदरचा ट्रॅक्टर ट्रॉली वाळूसह पोलीस स्टेशनला आणली. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे वडूज येथे गु.र.क्र. २००/२020 भा.दं.वि चे कलम ३७९ व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.ना. श्री. आर. एस. सरतापे ब.नं. ६८३ यांनी केला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपास पूर्ण झाल्यानंतर पुरेसा पुरावा मिळून आल्याने आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी १६ वर दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे सा.क्र.१ अमीर तांबोळी (नि.क्र.१८), सा.क्र. २ संदिप शेडगे (नि.२१), सा.क्र. ३ भिमराव कदम (नि.२३), तपासी अंमलदार

सा.क्र. ४ राहुल सरतापे (नि. २६) यांची साक्ष नोंदविलेली आहे. आरोपीविरुध्द पुरावा आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नि. २८ वर आरोपीची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये आरोपीने त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल करण्यात आला असल्याचा बचाव घेतला.

६. अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. व्ही. जोशी व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. भोसले यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तूत खटल्याच्या निकालासाठी उदभवलेले मुद्दे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. ०२.०६.२०२१ रोजी रात्री २३.४५ वाजताचे सुमारास मौजे वडुज गावचे हद्दीत मामाचा मळा येथील वडुज ते सिध्देश्वर कुरोली जाणारे रोडवर असलेल्या पुलाशेजारी आरोपी त्याचे स्वतःचे फायद्यासाठी बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक लबाडीच्या इरादयाने शासनाच्या परवानगीशिवाय करत असताना मिळून आला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने शासनाचे परवानगीशिवाय (विना परवाना) वाळुचे उत्खनन करुन बेकायदेशीर वाळूची वाहतुक करुन पर्यावरणाचा –हास केला हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |

३. आदेश काय? आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.

## कारणमिमांसा

८. आरोपीवरील दोषारोप सिध्दी करीता अभियोगपक्षाने '' घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा शासनाचे संमतीविना वाळु अनाधिकृतरित्या लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायदयासाठी त्याच्या मालकीच्या पावर टेक कंपनीची ४४५ मॉडेलच्या निळया रंगाचा ट्रॅक्टर व निळया रंगाची कृषीधन सातारा कंपनीची ट्रॉलीमधुन वाळूची चोरटी वाहतुक करीत असताना मिळून आला तसेच त्यामुळे पर्यावरणाचा –हास झाला '' हे सिध्द केले आहे किंवा कसे हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

## मुद्दा क्र. १ व २ साठी :

९. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण चार साक्षीदारांचा पुरावा नोंदविला आहे. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र. १ अमीर व सा.क्र. ३ भिमराव हे घटनास्थळ पंचनामा तसेच जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असुन त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि. ०३/०६/२०२० रोजी पोलीसांनी पंचनामे करणेसाठी बोलविल्याचे त्यांना आठवत नसल्याचे व पंचनाम्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षाला मदत केलेली नाही. त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारांचा भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सुचक

प्रश्न विचारण्याची परवानगी घेऊन उलटतपास घेतला असता त्यामध्येही त्यांनी जप्ती पंचनामा व घटनास्थळाचा पंचनामा साक्षीदारांच्या समक्ष झाल्याबाबतचा कोणताही पुरावा अभियोगपक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी सा. क्र. २ संदिप यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि. ०२/०६/२०२० रोजी त्यांची वडूज पो.स्टे. ला पोलीस शिपाई म्हणून नेमणुक होती. त्यावेळी पोलीस निरीक्षक पाटील म्हणून होते. त्यादिवशी त्यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे वडूज हद्दीत मामाचा मळा नावाचे शिवारातील ओढयामध्ये काही इसम ट्रॅक्टरच्या मदतीने वाळूची वाहतुक करत आहेत. त्यांनी त्यांना, पो.हवा, वायदंडे, पो.कॉ. हांगे, बदडे यांना बोलावुन घेते व कारवाई करणेस सांगितले. ते सदर ठिकाणी गेले. ते ओढयाच्या पुलाच्या आडोश्याला थांबले. तेथे ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये काही इसम वाळू भरत होते. त्यांची चाहुल लागताच सदर इसम व ट्रॅक्टरचा चालक ट्रॅक्टर सोडून अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. त्याठिकाणी ट्रॅक्टर व ट्रॉली व त्यामध्ये वाळू होती. त्यानंतर ते घेवून ते पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर चालक व इसमांविरुध्द फिर्याद दिली. आरोपींतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला त्यामध्ये त्याने सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली आहेत.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले तपासी अंमलदार सा. क्र. ४ राहुल यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि. ०३/०६/२०२० रोजी ते वडूज

पो.स्टे. येथे कार्यरत होते. त्यादिवशी त्यांच्याकडे गु.र.नं. २००/२०२० चा तपास देण्यात आला. तपासकामी त्यांच्याकडे खबरी जबाब, एफ आय आर, ई मेल, जप्ती पंचनामा, मुददेमाल पावती दिले होते. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा नि. २७ केला. साक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविली. वाहनाची कागदपत्र हस्तगत केली. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्याने असे कथन केले आहे की, फिर्याद अज्ञात व्यक्तीविरुध्द दाखल केली होती. त्याने हे मान्य केले आहे की, आरोपी त्याच्या पुर्व परीचयाचा आहे, गुन्हयातील जप्त वाहन आरोपीच्या मालकीचे नाही, त्याला घटनास्थळाच्या चतुर्सीमा सांगता येणार नाहीत, कोणत्याही साक्षीदाराने आरोपीचे नाव सांगितलेले नाही, त्यांनी स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा नोंदविलेला नाही. इतर सर्व सुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिली आहेत.

१२. अभिलेखावरील संपुर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता, सा.क्र. १ अमिर व सा.क्र. ३ भिमराव हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षाला मदत केलेली नाही. अभियोगपक्षाला त्यांचे उलटतपासातही आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आणता आलेला नाही. सा.क्र. ४ राहुल हा तपासी अंमलदार आहे. त्याने त्याचे पुराव्यामध्ये त्याच्याकडे जप्ती पंचनामा तपासकामी देण्यात आला होता असे कथन केले आहे. सदरचा पंचनामा हा तपासी अंमलदार यांनी केलेला

नाही. त्यांचे पुराव्यातही त्यांनी त्या पंचनाम्याबाबत काही कथन केले नाही. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये त्यांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केल्याचे कथन केले आहे. तो पंचनामा नि. २७ वर आहे. परंतु सदर पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षाला मदत केलेली नाही. त्यामुळे सदरचा पंचनामा हा संशयाच्या पलीकडे जावून अभियोगपक्षाला सिध्द करता आलेला नाही.

१३. सा.क्र. २ संदिप हा फिर्यादी आहे. त्याने त्याचे पुराव्यामध्ये सदरची घटना किती वाजता घडली, कोणत्या गावच्या हद्दीत घडली याबाबत कथन केलेले नाही. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यामध्ये ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये काही इसम वाळू भरत होते त्यांची चाहुल लागताच ते अंधाराचा फायदा घेवून पळून गेले असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने काही इसम म्हणजे किती इसम याबाबत काहीही सांगीतलेले नाही. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादमध्ये त्याठिकाणी जावून पाहिले असे नमुद करण्यात आलेले आहे. परंतु साक्षीमध्ये आम्ही ओढयाच्या आडोश्याला थांबलो असे कथन करत आहे. सदर साक्षीदाराने ट्रॅक्टर व ट्रॉलीचा नंबर सांगितलेला नाही. तसेच त्यामध्ये किती वाळू होती हे ही सांगितलेले नाही. सदर साक्षीदाराच्या पुराव्याला दुजारा देण्याचा कोणताही पुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. सा.क्र. २ संदिपने दिलेली फिर्याद व न्यायालयात दिलेली साक्ष यामध्ये तफावतपणा असल्याचे दिसून येत आहे.

१४. तपासी अंमलदार यांनी स्वतंत्र साक्षीदाराचे तपास टिपण घेतलेले

असल्याचे दिसून येत नाही. घटनेच्या वेळी स्वतंत्र साक्षीदार हजर होते किंवा नाही त्याबाबत साक्षीदारांनी काहीही कथन केलेले नाही. अभियोगपक्षाला पुरेशी संधी असतानाही त्यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही अगर त्याबाबतही काहीही कथन केलेले नाही. प्रस्तुत खटल्यात तपासी अंमलदार यांनी पोलिस साक्षीदार घेतेलेले आहेत. स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा का नोंदविलेला नाही याचा खुलासाही त्यांनी दिलेला नाही. सदर साक्षीदारांचे पुराव्याला बळकटी येण्यासाठी स्वतंत्र साक्षीदाराच्या पुराव्याची आवश्यकता होती. साक्षीदाराने सांगीतलेले घटना ठिकाण व तपासी अंमलदार यांनी केलेला घटनास्थळाचा पंचनामा हे वेगवेगळे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संशय निर्माण होत आहे.

१५. एकंदरीत वर कथन केलेल्या कारणास्तव घटनास्थळ व जप्ती पंचनामा संशयाच्या पलीकडे जावून सिध्द झालेला नाही. तपासी अंमलदार स्वतंत्र साक्षीदारांचा पुरावा नोंदविलेला नाही. साक्षीदाराचे पुराव्याला दुजोरा देणारा पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा शासनाचे संमतीविना वाळु अनाधिकृतरित्या लबाडीच्या इराद्याने स्वतःच्या फायदयासाठी त्याच्या मालकीचा एक पावरटेक कंपनीचा ४४५ मॉडेलाचा निळया रंगाचा ट्रॅक्टर त्याचा चेसी नंबर बी–३१८९२६७ व इंजिन क्र. इ ३२८९९४६ मधुन वाळूची चोरटी वाहतुक करीत असताना मिळून आला त्यामुळे पर्यावरणाचा –हास झाला ही बाब संशयाच्या पलिकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोगपक्षाला अपयश आले आहे. त्यामुळे सदरचा खटला निर्विवादपणे सिध्द

झालेला नाही. अशा परिस्थितीत आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ :-</u>**

१६. वरील मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीस त्याच्या विरुध्द लावण्यात आलेल्या आरोपांतुन निर्दोष मुक्त करणे योग्य होईल. प्रस्तुत खटल्याचे अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता, त्यामध्ये एक ब्रास वाळू जप्त असल्याचे दिसून येत आहे. सदरची वाळु ही मौल्यवान आहे. त्यामुळे सदरचा मुददेमाल अपिल कालावधी नंतर महसुल अधिकारी, वडूज यांनी लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम शासन जमा करावी. तसेच सदर गुन्हयातील एक पावरटेक कंपनीचा ४४५ मॉडेलाचा निळया रंगाचा ट्रॅक्टर त्याचा चेसी नंबर बी- ३१८९२६७ व इंजिन क्र. इ ३२८९९४६ हा मुळ मालकाला सुपूर्तनाम्यावरती अंतरिम ताबा देण्यात आलेला आहे. तरी सदरचा ट्रॅक्टर अपिल कालावधीनंतर मुळ मालकाकडे कायम करणे योग्य व न्यायोचित होईल. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतीभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. अंततः मी मुददा क्रमांक ३ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी समीर श्रीकांत गोडसे रा. वडूज ता. खटाव याची भारतीय दंड विधान कलम ३७९ व पर्यावरण संरक्षण अधिनियमचे कलम १५ प्रमाणे असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जमानत पत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदर गुन्हयातील जप्त १ एक पावरटेक कंपनीचा ४४५ मॉडेलाचा निळया रंगाचा ट्रॅक्टर त्याचा चेसी नंबर बी– ३१८९२६७ व इंजिन क्र. इ ३२८९९४६ चा अंतरीम ताबा मुळ मालकाकडे अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येत आहे.

४. महसुल अधिकारी, वडूज यांनी सदर खटल्यातील जप्त मुददेमाल एक ब्रास वाळुची अपिल कालावधी नंतर लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम शासन जमा करावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे निकटतम अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतिभुतीसह जमानत पत्र दयावे.

(शिवाजी आर. गुळवे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
वडूज.

दिनांक : २७.०२.२०२५
ठिकाण : वडूज.